# सौदा

आपल्या देशात मोठमोठ्या शहरात परदेशी नागरिक दिसतात. शिक्षण, नोकऱ्या, पर्यटन, अशा निरनिराळ्या कारणांनी हे लोक भारतात येतात. आपल्यापेक्षा भिन्न वेष, भाषा, रंग आणि चालीरीती यामुळे हे लोक चटकन ओळखू येतात. परंतु सांगली जिल्ह्यात मिरजेसारख्या तालुक्याच्या गावात परदेशी लोक मोठ्या प्रमाणात व दीर्घ कालपर्यंत वास्तव्य करतात असे म्हटल्यास कोणासही आश्चर्य वाटेल. पण ही गोष्ट खरी आहे. मिरजेला येणारे हे परदेशी पर्यटक म्हणजे अरब लोक.

## अरबस्थानातून मिरजेत येण्याची कारणे

अरब प्रवासी मिरजेला येण्याची कारणे पाहात असताना दोन प्रकारची कारणे पाहिली पाहिजे. (१) उघडपणे दाखविली जाणारी – यामध्ये मुख्यत: मिरजेच्या वैद्यकीय व्यवसायाचा उल्लेख केला जातो. मिरज मिशन हॉस्पिटल आणि निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार करून घेण्याच्या निमित्ताने अरब लोक मिरजेला येतात. अशा प्रकारचे उपचार इतरत्र हा करून घेता येतील; पण उपचारासाठी आल्यावर राहणे, खाणे आणि इतर सोयी इतर ठिकाणापेक्षा मिरजेस स्वस्त पडतात हे एक कारण सांगितले जाते. (२) सुप्त कारणे -औषधोपचार हे उघड कारण पण मौजमजा करण्यासाठी बरेच अरब लोक या ठिकाणी येतात, आणि मौज मजा चांगल्या तऱ्हेने करण्याजोगी अनुकूल परिस्थिती मिरजेमध्ये निर्माण झाली आहे.

जवळजवळ ७० हजार लोकसंख्या असणाऱ्या मिरज शहरात मुस्लिम समाज बहुसंख्यांक आहे. उद्योग-धंद्याचा विकास खुंटला असलेल्या या शहरात बेकारांची संख्या फारच मोठी आहे. त्यात मुस्लिम समाजातील बेकारांचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे पानपट्टी दुकान, हमाली, टांगा, छोटे विक्रेते अशा नानाविध अनुत्पादक कामामध्ये लोकसंख्येचा बराच मोठा भाग गुंतला आहे. ह्यामुळे दीन, खंगलेले, मिळेल ते काम करण्यास आतुर आतुर असलेले चेहरे सगळीकडे पहावयास मिळतात. यात अनैतिक किंवा बेकायदेशीर कामे करणारासुद्धा एक मोठा विभाग तयार झाला आहे. हातभट्टीची दारू, फसवाफसवी करणाऱ्या टोळ्या, वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया किंवा या व्यवसायास मुलींना प्रवृत्त करणारे दलाल, मधे बंद पडलेला पण परत चालू झालेला मटका व्यवसाय, सिनेमाच्या तिकीटांचा काळाबाजार करून जगणारे असे विविध व्यवसाय-व यातून कोणत्याही सामाजिक बंधनाबद्दल बेफिकिरी बाळगणारे काही लोक तयार झाले आहेत.

औषधोपचार ह्या कारणासाठी मिरजेत आलेले अरब हे साधारणपणे ४ महिने ते १ वर्षापर्यंतसुद्धा इथे रहातात. आजाराची तीव्रता कमीजास्त दाखवून ही मुदत कमी जास्त करता येते. साधारणपणे जानेवारी ते जून या महिन्यात येऊन राहणाऱ्या अरबांची संख्या जास्त असते. पण सर्वसाधारणपणे ३०० ते ४०० अरब मिरज येथे असतात.

## लोकांची अरब ग्राहक मिळवण्यासाठी धडपड व एजंटांची डल्लेबाजी

मिरजेला येणारे अरब लोक हे बहुतांशी अरब राष्ट्रातील नैसर्गिकतेल संपत्तीच्या जोरावर थोड्याच काळात लखपती झालेले असे आढळतात. सर्वसाधारणपणे अरब भारतात येऊन माणशी २०।२५ हजार पासून ६०।७० रुपयांची उधळपट्टी करतात. याचा फायदा मिळवण्याचे

लाचार एजंट व गरजू लोक सतत करीत असतात. परंतु याचा मोठा हिस्सा मात्र लॉजिंगवाल्यांना व एजंट लोकांना मिळतो. मिरजेमध्ये लॉजिंग्ज व विशिष्ट भागातील भाड्याची घरे यात अरब लोक उतरतात. लॉजिंगचे नेहमीचे दर धाब्यावर बसवून १०।२० रु. रोज दराची खोली ५०।६० रु. रोजाने दिली जाते. अशा मोठ्या फायद्याच्या अरब गिऱ्हाईकांची वाट पहात बसलेले लॉजिंगवाले खोल्या खाली असल्या तरी देशी लोकांना लॉजिंगमध्ये कित्येकदा जागा देत नाहीत.

अरबांच्या अगदी जवळचे असणारे व पैशासाठी कित्येक मुलींचा बळी देणारे लोक म्हणजे एजंट लोक. असे १५।२० लोक मिरजेत आहेत. यातील ३।४ मुख्य आहेत. यांना अरबी भाषा बोलता येते. त्यांचे दुबई, मस्कत व जेथून अरब लोक येतात त्या देशातसुद्धा जाणेयेणे असते. स्थानिक व प्रवासी लोकांशी घनिष्ट संबंध, आचरणात आक्रमक वृत्ती, अरबी भाषेचे ज्ञान इतक्या भांडवलावर हे एजंट लखपती झाले आहेत आणि पैसा मिळविण्यासाठी त्यांचे अनेक धंदे चालू असतात. त्यांची काही उदाहरणे खाली दिली आहेत. १) लॉजिंगच्या मालकाशी एजंटांची खूप दोस्ती असते. अरब प्रवासी निघण्यापूर्वीच पत्रव्यवहार करून निघतात. एजंटला गाठले की हमखास लॉजिंगची सोय होते. २) वेश्या एजंटशी संपर्क ठेवून असतात. ३) एजंटाचा रेल्वे कर्मचाऱ्यांशीही संपर्क असतो. त्याचप्रमाणे टॅक्सी, रिक्षा, डॉक्टर्स, हॉस्पिटल कर्मचारी या संबंधीची अरबांची गरज एजंटाच्या मध्यस्थीने त्वरीत भागवली जाऊ शकते. ४) एकंदरीत वरील सर्व बाबींमध्ये एजंट भरपूर कमीशन घेत असतो. काही अरब हे मिरजेत येऊन लग्न करू इच्छितात. ही इच्छा पूर्ण करण्याचे काम एजंटच्या मध्यस्थीनेच होऊ शकते. लग्न जमविण्याच्या व्यवहारात सर्वात जास्त फायदा होतो.

निरक्षर आणि तरूण मुलींच्या पालकाला मुलगी म्हणजे डोक्यावरचे ओझेच वाटत असते. तरूण मुलींना जेवण, कपडालत्ता देऊन कमीत कमी खर्चात लग्नाचा वर शोधत बसणारे दरिद्री पालक खूप आहेत. जसजसे मुलीचे वय वाढत असते तसतसे पालक अस्वस्थ होत असतात. अशा पालकांना हे एजंट गाठतात व आपल्याच जातीतील अरब वर लग्नाला मिळवून देतो पैसेही मिळतील ' असे सांगतात. ' मुलीचे रूप पाहून २ ते ४ हजार रुपये तुम्हाला देऊ आणि लग्नाचा सर्व खर्च त्यालाच करायला लावू ' असे सांगून सौदा ठरतो. एजंट स्वतःच्या पदरचे पाचशे ते हजार रुपये पालकाला देऊन अशा मुलीचे ' बुकींग ' करतो.

लग्न करू इच्छिणाऱ्या अरबाला एजंट अशा मुलींचे फोटो दाखवितो. १० ते १५ हजार रुपये लग्नाचा खर्च येईल असे सांगितले जाते. पसंत पडेल त्या मुलीला व तिच्या पालकाला अरब राहत असलेल्या जागी आणले जाते व एक मुल्ला आणून लग्न लावले जाते. साधारणपणे पालक महेरची रक्कम थोडी जास्त म्हणजे १,००० ते २,००० रुपये असावी असा प्रयत्न करतो. (मुस्लिम समाजात महेर म्हणजे मुलीच्या हक्काची पतीकडे असणारी रक्कम असे मानले जाते. ती रक्कम मुलीला देऊन पतीला केव्हाही घटस्फोट घेता येतो.) लग्न झाल्याबरोबर एजंटकडून ठरल्याप्रमाणे मुलीच्या पालकाला राहिलेले दोन अडीच हजार रुपये दिले जातात; व अरब सर्व रक्कम एजंटला देतो. साधारणपणे एका लग्नामागे एजंटला ५ ते ७ हजार रुपये फायदा होतो.

बहुतांशी लग्न करणारे अरब म्हातारे किंवा प्रौढ असतात. काही महिन्यांनी अरब मायदेशी जायला निघतो. नवीन झालेल्या बायकोला ' व्हिसा ' मिळत नाही, तिकडे जाऊन व्हिसा पाठवुन तुला बोलावून घेतो. ' असे सांगून बायकोला मिरजेतच ठेवतो व स्वतः निघून जातो. नंतर ५।६ महिने मुलीच्या नावावर ५००।६०० रुपयांची मनीऑर्डर येत असते. त्यानंतर काहीच संबंध राहात नाही. फार झाले तर एजंटला मध्ये घेऊन महेरची रक्कम मागवली जाते व घटस्फोट झाल्यात जमा होतो.

पुढे काही दिवसांनी त्या मुलीचे दुसऱ्या अरबाबरोबर लग्न होते; पण भाव कमी होतो. परत वरील घटनांची पुनरावृत्ती व नंतर तिसरे लग्न. आणि साधारणपणे तीन लग्ने झाल्यावर त्या मुलीला छानछोकीत राहण्याची सवय जडलेली असते. त्यातून निर्माण होणाऱ्या गरजा भागविण्यासाठी आधी गुप्त व नंतर उघड वेश्याव्यवसायास सुरूवात होते. सध्या अशा वेगवेगळ्या टप्प्यात असंख्य मुली मिरजेत आहेत. काही

अरब ५।६ वर्षांपर्यंत पैसे पाठवतात. व वर्षदोन वर्षातून ४।६ महिने मिरजेत येऊन राहातात. काहीजण लग्न झाल्यानंतर बायकांना स्वदेशात घेऊनही गेले आहेत. तेथे घरकामास पगारी चाकर ठेवला तर मासिक पगार हजाराच्या घरात जातो. इथून लग्न करून मुली नेल्यास घरकामासाठी फुकटात त्यांना राबवता येते. तिथे त्यांच्या आणखी बायका असतातच.

एके ठिकाणी प्रत्यक्ष चौकशी केली असता असे आढळले की एका माणसाने आपल्या मेहुणीचे लग्न अरबाबरोबर लावून दिले, आणि तिसऱ्याच दिवशी घटस्फोट झाला. दुसऱ्या एका केसमध्ये एका ६५ वर्षांच्या अरबाशी एका १५ वर्षाच्या वयात न आलेल्या मुलीचे लग्न लावून देण्यात आले. पहिल्याच रात्री मुलगी त्याच्याकडून पळून आली. पोलिसांनी मुलीला ताब्यात घेऊन ज्याने लग्न लावले त्या मौलवीवर खटला भरला. आणखी एका प्रसंगी अरबांनी एका दलित वर्गातील मुलीची छेड काढल्याबद्दल मुलीच्या भावाने त्यांच्याशी मारामारी केली. अशा रितीने स्थानिक लोकांचा तुरळक प्रतीकार दिसून येतो.

एकंदरीत मिरजेत येणाऱ्या अनेक वयस्क व प्रौढ अरबांची लग्न करण्याची आकांक्षा असते. या मागे तीन कारणे आहेत. १) आर्थिक दृष्टीने परवडणे. २) स्वतःचे वय कितीही असले तरी तरुण सुंदर मुलीचा व्यवस्थित व हक्काने भोग ३) वेश्येकडे गेल्याने होणाऱ्या रोगांची भीती. श्रीमंतीच्या बळावर धार्मिक मान्यता असलेल्या चाकोरीतून अशा पाशवी वासना शमविण्याची प्रयत्न न झाला तरच नवल. एकंदरीत सध्या मिरजेमधील विविध अनुत्पादक व्यवसायांना चालना मिळाली आहे. भारतीय सरकारला परकीय चलन मोठ्या प्रमाणात मिळत आहे. परंतु या पायी अनेक स्त्रियांचा व कोवळ्या मुलींचा बळी दिला जात आहे, माणूसकीचा चुराडा होत आहे याची पर्वा कोणालाच नाही.

शेवटी प्रश्न असा निर्माण होतो की या सर्व प्रकाराला जबाबदार कोण ? कारण काही वरवर मलमपट्टी करून आहे ती चौकट कायम ठेवू इच्छिणारे 'यांची जबाबदारी मुस्लिम धर्मावर व मुस्लिमांवर आहे' असे विचार मांडतात. हा प्रश्न केवळ मुस्लिम मुलींचा नसून आर्थिक गुलामगिरीत अडकलेल्या व राजकीय, शैक्षणिक क्षेत्राची तोडओळख न झालेल्या सर्वसामान्य हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन इत्यादी सर्व धर्मातील लोकांचा आहे. केरळमधीस ख्रिश्चन मुलींना फसवून परदेशात नेऊन विकणे असे प्रसंग याच दारिद्रयामुळे घडतात. आणि देवदासींची चाल याच आर्थिक दूरवस्थेतून रूढ झाली याची जाणीव हे संस्कृतिरक्षक ठेवत नाहीत. पुरोगामी मानणाऱ्या व काही सामाजिक कार्य करणाऱ्या किंवा करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यासमोर संस्थांसमोर, मुख्यतः स्त्री कार्यकर्त्यांच्यासमोर हे एक आव्हानच आहे. आर्थिक हलाखीमुळे विक्रीचा माल म्हणून बाजारात उभे राहणे हा एकच मार्ग स्त्री समोर, उभा राहतो व तोच तिला स्वीकारावा लागतो. केवळ काही राजकीय हक्कांना महत्त्व देणाऱ्या लोकशाहीत या कायदेशीर बलात्काराविरूद्ध आवाज उठत नाही. स्त्रीच्या या शोषणाची कारणे एखाद्या धर्मात न शोधता स्त्रीच्या आर्थिक गुलामगिरीत आहे हे ओळखले तरच ही गंभीर समस्या सोडविण्याची शक्यता निर्माण झाली आहे असे म्हणता येईल.

--अभ्यासू

## चूल

चूल पेटलेलीच आहे ...
लसलसत्या ज्वालांची दाहक आग
चेहरा मूकपणे शोषतो आहे...

कणाकणानं चिपाडं सरताहेत
तरीही अवेळीच सुकलेला हात
थकतच भाकरी थापतो आहे...

चूल विझू पहात आहे
हात थांबू पहात आहे
उघड्या दाराशी थांबलेला
काळामिट्ट काळोख
झोपडीचा कानाकोपरा
व्यापू पहात आहे...

–प्रतिभा पोरे